(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed & Refereed Indexed


Multidisciplinary International Research Journal

**October-2021**

ISSUE No- (CCCXXIII) 323





**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor :**
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe ArtsComm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

## The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refereed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## October-2021

ISSUE No- (CCCXXIII) 323

### Sciences, Social Sciences, Commerce, Education, Language & Law

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr.Dinesh W.Nichit**
Editor
Principal,
Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, Walgaon.Dist. Amravati.

**Dr.Sanjay J. Kothari**
Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

**Aadhar International Publication**
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

## INDEX



| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | भारतातील दारिद्रय : कारणे व उपाययोजना | प्रा.डॉ.सुरेश बन्सपाल | 1 |
| 2 | शेतकऱ्यांच्या कष्टमय जीवनाचे वास्तवदर्शन घडविणारा संग्रह - पोशिंद्याची कविता | प्रा. डॉ. पी. आर. जाधव | 7 |
| 3 | सुलोचना सदाशिव डोंगरे यांचे आंबेडकरी चळवळीतील कार्य | प्रा.डॉ.कुसमेंद्र गं.सोनटक्के | 10 |
| 4 | वर्धा जिल्ह्यातील भूपृष्ठरचनेनुसार लोकसंख्या वितरण आणि घनेतेचे भौगोलिक अध्ययन | प्रा. नारायण गोविंदराव सोनुले | 12 |
| 5 | ग्रामीण आर्थिक विकास एवं पुनर्निर्माण : गांधीजी | डॉ. शुभ्रा मिश्रा | 17 |
| 6 | शब्द-शक्ति का अर्थ, परिभाषा एवं भेद ( प्रकार) | डॉ शिवाजी नागोबा भदरगे | 21 |
| 7 | भातगिरणी व्यवसायाचे ऐतिहासिक समिश्रण व श्रमाचे बदलते स्वरूप | डॉ. एस.एच. भैरम | 31 |
| 8 | ई लर्निंगची नवी व्यवस्था स्वयंम एक (SWAYAM) दृष्टीक्षेप | Dr. Sarla Nimbhorkar | 36 |
| 9 | संत आणि लोक भ्रमंती तीर्थाटन | डॉ. राजेश मिरगे | 39 |
| 10 | भारतीय संगीतातील अमुल्यठेवा : संगीत सम्राट तानसेन | डॉ. प्रज्ञा मेश्राम | 43 |
| 11 | प्रा.आशा थोरात यांचे अंगठा ते सही एक आकलन | डॉ.गजानन बनसोड | 50 |
| 12 | लिंग विषमता - समाजशास्त्रीय दृष्टीकोन | प्रा. डॉ.कोते ए.व्ही. | 54 |
| 13 | डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विचारातील आर्थिक समृद्धीचा मार्ग : कृषी उद्योजकता प्रशिक्षण. | प्रा. डॉ.सुनिता कलाखे | 58 |
| 14 | डिजिटल लायब्ररी आणि ई-लर्निंग | डॉ. एकता मेनकुदळे | 64 |
| 15 | कर्मचारी राज्य विमा योजना | डॉ. संजय जगदेव कोठारी | 68 |
| 16 | भिक्खु आनन्दथेर का सामाजिक चिंतन | प्रा. डॉ. बी.एम. मानवटकर | 74 |
| 17 | Kamala Das as a Confessional Poet | Dr.Nilima S.Tidke | 78 |
| 18 | Caste and Gender Issues in Baby Kamble's 'The Prison We Broke' | Dr. Asrar R. Khan | 83 |
| 19 | A Sociological Study Of Single Parents Problem | Dr. Pramila Haridas Bhujade | 86 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 323(CCCXXIII) | October, 2021

# शेतकऱ्यांच्या कष्टमय जीवनाचे वास्तवदर्शन घडविणारा संग्रह - पोशिंद्याची कविता

प्रा. डॉ. पी. आर. जाधव
स्व. दत्तात्रेय पुसदकर कला महाविद्यालय, नांदगाव पेठ, ता. जि. अमरावती
मो. नं. - 9423649072.

**प्रस्तावना :**

प्रस्तुत पोशिंद्याची कविता हा डॉ. गजानन जाधव यांनी संपादित केलेले शेतकऱ्यांच्या कष्टमय जीवनाचा वास्तव वेध घेणारा कविता संग्रह असून अथर्व पब्लिकेशनने प्रकाशित केला आहे.

सदर काव्य संग्रहात एकूण ४२ नामवंत ग्रामीण कवींच्या कवितांचा संपादित केला आहे. या संग्रहाच्या माध्यमातून शेतकऱ्याच्या कष्टमय जीवनाचे वास्तव व यथार्थ जीवन चित्रण या कवीच्या कवितांमधून अभिव्यक्त झाले आहे. या शोधनिबंधातून शेतकऱ्याच्या जीवनातील कष्टप्रद वास्तवाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**भूमिका :**

प्रस्तुत शोधनिबंध हा संपादित काव्यसंग्रहात शेतकऱ्यांप्रती असलेली कवींची संवेदना व त्यातून कवींनी व्यक्त केलेली शेतकऱ्यांच्या कष्टमय जीवनाचे चित्रण व आजची शेतकऱ्यांची स्थिती याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**विषयाचे महत्त्व :**

प्रस्तुत शोध निबंध हा आज शेतकऱ्यांची होत असलेली वाताहत, शेतकऱ्यांच्या आत्महत्या व एकंदरीत शेती व शेतकऱ्यांची झालेली दुर्दशा पाहता या निबंधातून त्या मागची काही कारण मिमांसा शोधने या दृष्टीने महत्त्वाचे वाटते. शेतकऱ्यांच्या दुरावस्थेस कारणीभूत घटकांचा शोध घेण्याच्या दृष्टीनेही या शोध निबंधाचे महत्त्व आहे.

विठ्ठल वाघ हे ग्रामीण व शेतकऱ्यांच्या समस्येला जागर करणारे कवी म्हणून प्रख्यात आहेत. विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील महागाव तालुक्यातील 'चिखलगव्हाण' येथील शेतकरी साहेबराव पाटील करपे यांनी त्यांची पत्नी व चार मुलांसह दत्तापूर वर्धा येथे १९ मार्च १९८६ रोजी केलेली सामूहिक आत्महत्या ही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची आत्महत्येची पहिली घटना आहे. या घटनेवर विठ्ठल वाघांची 'साहेबराव पाटील' ही कविता अत्यंत विस्ताराने प्रकाश टाकते.

"तुंह सरन पेटल्यावर मसनात एक म्हातारा सांगत होता म्हणंतात
आता कापूसजवारी पेरतात लाखो हरंमौतीनं मरसान
आता पेरा तासातासानं लोखंडी दगळी गोटे चारी मेरीनं वाभुइचे खम्मन काटे..... " (१)

सरकार, सावकार, बाजारभाव या कचाट्यात अडकलेला कापूस पिकवण्यास विदर्भातील शेतकरी निसर्ग व अवर्षणाच्या पेचात अडकतो आणि त्याची स्वप्न, प्रत्यक्षात उतरत नाही तेव्हा तो आत्महत्येचा मार्ग पत्करतो. या आत्महत्येस जबाबदार केवळ सरकार, सावकार, निसर्ग व बाजारभाव आहेच याहीपेक्षा मूग मिळून गप्प बसणारा हा उच्चभ्रू पांढरपेशा समाज आहे. म्हणूनच विठ्ठल वाघ म्हणतात....

"तू मले माफ करू नको
कधीच माफ करू नको साहेबराव !"...

या घटनेला समाजही तितकाच जवाबदार आहे, हे विठ्ठल वाघ व्यक्त करतात. शेतकऱ्याला या परिस्थितीतून बाहेर काढायचे असेल तर विठ्ठल वाघाच्या 'साहेबराव पाटील' या कवितेविषयी डॉ. म. सु . पगारे म्हणतात. ...

"कृषिप्रधान असणाऱ्या या देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी माणसाला लाजेने मान खाली घालायला लावली" (२)

कवी इंद्रजित भालेराव आपल्या कवितेमधून कष्टकऱ्या शेतकऱ्यांच्या मुलाला जीवन संकटसमयी हिंमत देताना म्हणतात....

"'शीक बाबा शीक लढायला शीक
कुणब्याच्या पोरा आता लढायला शीक"

शेतकऱ्यांना आत्महत्यांपासून परावृत्त करायचे असेल तर स्वतः शेतकऱ्यांनी त्यातून मार्ग काढायला हवा यासाठी लढायला शिकणे गरजेचे आहे कारण संघर्षाशिवाय न्याय मिळत नाही. हे जीवनाचे सूत्र आहे. मग सरकार असेल, बाजारभाव असेल या विरोधात संघर्ष करून आपला हक्क प्राप्त केल्याशिवाय शेतकऱ्यांची उन्नती नाही. सरकार व सावकारापुढे हात पसरण्यापेक्षा कवी म्हणतात त्याप्रमाणे

"गाळलेल्या घामाचा रस्त्यावर टीक'
हक्कासाठी लढ बाबा मागू नको भीक"

शेतकरी जगला तर संस्कृती जगेल कारण भारत हा कृषिप्रधान संस्कृतीचा देश आहे. परंतु आज शेतकऱ्यांच्या अस्तित्वावर चोहीकडून हल्ला होत आहे. ऐष आरामात चैनी जीवन जगणारे लोकांची शहराकडे असलेली धाव आणि तरुण पिढीतील शेतात कष्ट करण्याबाबतची उदासीनता यासारख्या घटनांमुळे शेती आता तोट्याचा व्यवहार वाटू लागला आहे. शेतीत काम करणे आता प्रतिष्ठेचे नाही. त्यामुळे शेतीपासून दूर जाणारा तरुण वर्ग आज खेड्यापाड्यात दिसतो आहे. ही काही कारणे शेतकऱ्यांच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरत आहे. या सोबतच सरकारच्या फसव्या योजना, बँक अधिकाऱ्यांकडून होणारी शेतकऱ्यांची अडवणूक, बियाणे कंपनीकडून होणारी बोगसबाजी, खते आणि रासायनिक औषधांचा वाढलेला प्रचंड भाव, शेतकामाला मजूर न मिळणे, मिळाले तर बेभाव व जास्त दराने मजुरी घेणे या सर्वांतून कसाबसा उत्पन्न घेतलेला शेतकरी पीकमालाला बाजारात घेऊन जातो तेव्हा कवी जगदीश कदम म्हणतात त्याप्रमाणे .....

"पिकवलं किती जरी
दोर दुसऱ्याच्या हाती
बोली बोलता बोलता
राशी हर्राशीत जाती"

या प्रमाणे शेतकऱ्यांच्या मालाला बोली लावली जाते. कदाचित जगातील एकमेव असा शेतकरी आहे की त्याने पिकवलेल्या आपल्या मालाला तो भाव ठरवू शकत नाही. साधी पाच ग्रॅमची टूथपेस्ट बनविणारा कारखानदार छापील किमतीच्या लेबलसह बाजारात विकतो. परंतु क्विंटलभर जीवनावश्यक माल पिकविणारा शेतकऱ्यांचा माल बोलीच्या भावात विकावा लागतो. यावर कवी नारायण सुमंत म्हणतात त्याप्रमाणे....

"मालावर म्हणत म्हणत
तुझ्यावर बोली
लावली गेली आजवर "

तर शंकर वढे 'शेतकरी राजा' या कवितेमधून म्हणतात....

"नेला बाजारात माल

नाई हुंगल वो कोनी
आला ताकाचाचं भाव
कोन ओरपलं लोनी?"

अशी प्रेताच्या टाळूवरील लोणी खाणारी इथली व्यवस्था असल्याने अस्मानी सोबतच सुलतानशाहीत शेतकरी अडवला जातो. एकंदरीत या सर्वांचा परिणाम शेतकऱ्यांच्या जगण्यावर होतो. यातून कधी तो सावरतो तर कधीमात्र फासाचा दोर स्वतःहून गळयात अडकून घेऊन कायमची सुटका करतो.

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेती हा उद्योग शेतकऱ्यांच्या पाठीचा कणा मोडतो. जमिनीत राबराबून चोवीस तास कष्ट उपसून शेतकऱ्यांच्या हाती फारसे काही लागत नाही. ही विदारक अवस्था शेतीची झाल्याने आता पुढची पिढी शेतीत पाय ठेवील की नाही ही भीती वाटते. शेतीला पुन्हा सुगीचे दिवस आणायचे असेल तर शेतकऱ्यांप्रती सरकार, सावकार, बाजारभाव आणि समाजमन या सर्वांनी कृतीशील व संवेदनशील होणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा हरेकदिवशी शेतकरी आत्महत्या करतील. म्हणून ग्रामीण कवितेच्या संधर्भात 'जित्राब' या मराठी ग्रामीण कविता संग्रहातून संपादक प्रा. भैरव कुंभार व प्रा. मंदा कदम म्हणतात -"ग्रामीण कवितेकडे पुन्हा एकदा डोळसपणे पाहण्याची व बदलती खेडे आणि त्यातला माणूस ह्यांच्या संवेदनांचा कल्लोळ टिपण्याची स्फूर्ती प्रतिभावंतांना व्हावी आणि ग्रामीण कविता मराठी साहित्याचे वैभव ठरावी अशी अपेक्षा आहे." (३)

निष्कर्ष :

1) शेती हा उद्योग सरकार, सावकार, बाजार भावामुळे आतबट्यात आल्याचे दिसून येते.

2) शेती करणाऱ्याला आज फारशी प्रतिष्ठा मिळत नसल्याने आजची तरुण पिढी शेती करायला धजावत नाही.

3) शेतकऱ्यांसाठी विकासाच्या योजना ह्या प्रत्यक्ष शेतकऱ्यापर्यंत पोहचत नाही. सिंचन, चोवीसतास वीज उपलब्ध नसल्याने त्यांच्या उत्पन्नावर विपरीत परिणाम होतो. खर्च व उत्पन्नाचा मेळ बसत नसल्याने शेती तोटयाचा व्यवहार ठरत आहे.

4) चोवीसतास कष्ट उपसूनही बियाणे, औषधी, खते यांच्या वाढलेल्या प्रचंड किमतीमुळे शेतकऱ्यांच्या हाती फारसे काही उरत नाही.

सारांश :

उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ नोकरी असे चित्र असलेल्या भारतात आजमात्र शेती ही अत्यंत कनिष्ठ व्यवसाय मानल्या जाते. हे कृषिप्रधान देशासाठी लाजीरवाणे आहे. शेतकऱ्यांची अवस्था कोणी केली यापेक्षा ती का होत गेली त्याला बहुवंशी वरील करणे कारणीभूत आहे असे म्हणता येईल. शेतकरी बापाचे भावोत्कट आणि भव्योदात्त दर्शन प्रकट करताना डॉ. द. ता. भोसले म्हणतात - " बापाच्या रूपाने साकार झालेल्या शेतकरी जीवनावरील या कविता म्हणजे श्रमाचा उपासक, मूल्यांचा सर्जक, संस्कृतीचा शिल्पकार आणि जगाचा पोशिंदा असलेल्या एका शापित जीवनाचे महन्मंगल स्रोत गाणाऱ्या कविता आहेत" (४)

आधारभूत संदर्भ ग्रंथ :

१) जाधव प्रा. डॉ. गजानन - 'साहेबराव पाटील', 'पोशिंद्यांची कविता', अथर्व पब्लिकेशन धुळे - ००१, व्दितीय आवृत्ती - २०१५ - पृष्ठ क्र. - २३.

२) संपा - फाले केशव - 'काव्यधारा' प्रशांत पब्लिकेशन जळगाव ००१ पृष्ठ क्र. - ३२.

३) संपा - कुंभार भैरव, कदम मंदा, 'जित्राब' मराठी ग्रामीण कविता - हिरण्यकेशी प्रकाशन - कोल्हापूर आवृत्ती तिसरी - १९९८ पृष्ठ क्र. - ४०

४) संपा - जाधव डॉ. गजानन 'पोशिंद्यांची कविता' अथर्व पब्लिकेशन, धुळे ००१ व्दितीय आवृती २०१५ पृष्ठ क्र. - १७ प्रस्तावना.